# ग्रामविकास

## १. सीआर/३०८/वर्धा/१४

फिर्यादी हे वर्धा जिल्हयातील आर्वी येथे रहावयास असून त्यांचे देशमुख इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.नावाची कंपनी आहे. आष्टी ता. राजवाडी, जिल्हा वर्धा येथील डॉक्टर श्री कडू यांच्या शेतीच्या सपाटीकरण करण्याचे कंत्राट फिर्यादी यांच्या कंपनीने घेतले होते. त्याकरीता फिर्यादी यांच्या कंपनीचे २ जेसीबी मशीनचे सपाटी करणाचे काम चालू होते. आरोपी लोकसेवक क्र.१ सुनिल मनोहर कोरडे, उपविभागीय अधिकारी आर्वी, जि वर्धा वर्ग—१ यांनी फिर्यादीस सदरचे काम गैरकायदेशीर आहे, असे सांगुन फिर्यादी यांचे २ जेसीबी मशीन ताब्यात घेतल्या. फिर्यादी यांचेवर कारवाई न करण्याकरीता व त्यांच्या ताब्यात घेतलेल्या २ जेसीबी मशीन सोडण्याकरीता रु.२५०००/— लाचेची मागणी करुन ती आरोपी खाजगी इसम दीपक मोटवानी यांचे मार्फतीने स्वीकारली. सदरबाबत पो.स्टे. आर्वी जि वर्धा गु.र.क्र. ३०१५/१४ कलम ७, १२, १३ (१) (ड) सह १३(२) लाप्रका १९८८ अन्वये नोंद करण्यात येवून दोन्ही आरोपी लोकसेवक यांना अटक करण्यात आली आहे.

सदर गुन्हयात अटक आरोपी लोकसेवक सुनिल मनोहर कोरडे, उपविभागिय अधिकारी यांचे घरझाडतीमध्ये रोख रक्कम रु. २,६९,८८०/— व लॉकर झडतीमध्ये रु. ७,२९,२२५/—चे सोन्या चांदीचे दागीने, रोख रु. १० लाख मिळून आली.